REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.2331(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 7 | ISSUE - 10 | JULY - 2018

# मोबाईलचा विद्यार्थ्यांच्या अध्ययनावर होणारा परिणाम : एक अभ्यास

डॉ. शेखराम परसराम येळेकर
सहाय्यक प्राध्यापक
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे बॅरी. एस.के. वानखेडे शिक्षण महाविद्यालय, नागपूर

## प्रस्तावना :



आजच्या तंत्रज्ञानाच्या युगात संदेशाची देवाण घेवाण करण्यासाठी मोबाईल अत्यंत महत्वपूर्ण साधन आहे. आधी संदेशाची देवाण घेवाण करण्यासाठी पत्रव्यवहार, टेलीग्राम, रेडिओ, टी.व्ही. अशा साधनांचा उपयोग व्हायचा. यात काही एकमार्गी देवाण होती तर काही वेळ खाणारी यंत्रणा होती. तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे या अडचणीवर मात करणारी यंत्रणा अथवा शीघ्रातीशीघ्र व्दीमार्गी संदेशवहनाचे माध्यम म्हणजे मोबाईल विकसित झालेले आहे. आज प्रत्येकाजवळ मोबाईल आलेला आहे. शालेय विद्यार्थी व महाविद्यालयीन विद्यार्थी मोबाईलचा उपयोग करताना दिसून येतात. काही विद्यार्थी मोबाईलच्या खूपच आहारी गेलेले आहेत. मोबाईलच्या अती वापरामुळे आपला मुलगा अभ्यासच करीत नाही अशी पालकांची ओरड ऐकू येते. विशेष म्हणजे काही पालकही मोबाईलच्या खूपच आहारी गेलेले दिसून येतात. मोबाईलमुळे घरातील सदस्यांचा संवाद संपत आलेला आहे.

एका कविने मोबाईलच्या आहारी गेलेल्या आपल्या आईबाबांना मुलगा कशी विनवणी करतो? ते एका कवितेतून मार्मिकपणे व्यक्त केलेले आहे.

आई सोड मोबाईल, माझ्यासोबत बोल
थोडावेळ बागेमध्ये, खेळू आपण चल
सोबत तुला नेहमीच, मोबाईल लागतो केवळ
घरी आल्यावर तरी, घेना मला जवळ..
रात्रभर मोबाईल, असतो तुझ्या उशाला
तरी सुध्दा दिवसभर, सोबत ठेवतेस कशाला?
बाबा आज मोबाईल, ऑफिसमध्ये विसरा
माझा चेहरा होईल, आनंदाने हसरा
दिवसभर मोबाईल, तुम्ही हातामध्ये धरता
माझे बोट धरून, सांगा कधी फिरता
पुढच्या जन्मी मला, मोबाईल व्हायचे आहे
कारण मला दिवसभर, आई बाबांसोबत राहायचे आहे
आई बाबांसोबत राहायचे आहे

आई बाबांच्या मोबाईलच्या अती वापरामुळे आजची मुले त्रस्त झालेली आहेत. त्याचे अनुकरण लहान मुलेही करीत आहेत. मोबाईलच्या अती वापरामुळे विक्षिप्तासारखी वागत आहेत. मोबाईलवरील खेळ, चॅटींग, वाट्सॲप ट्विटर, फेसबुक, इंटरनेट सर्फींग केल्याशिवाय मुलांना चैनच पडत नाही.

पालकांनी मोबाईल खेळू दिला नाही तर मुले आक्रमक होतात असे निदर्शनास येते. म्हणून मुलांना मोबाईल हाताळावयास देताना पालकांनीही सतर्क राहाणे गरजेचे आहे. काही विद्यार्थी मोबाईलचा एक शैक्षणिक साधन म्हणूनही उपयोग करताना दिसून येतात. मोबाईलमुळे जग जवळ आलेले असले तरी घराघरातील जीव्हाळयाचे संबंधही कमी झालेले आहेत. विद्यार्थी मोबाईलचा उपयोग कसा करतो याचा वेध घेणे महत्वाचे आहे.

## संशोधन समस्येचे महत्व व गरज :

१. मुले मोबाईलच्या अती वापरामुळे विक्षिप्तासारखी वागत आहेत. मोबाईलवरील खेळ, चॅटींग, वाट्सअॅप ट्विटर, फेसबुक इंटरनेट सर्फींग केल्याशिवाय मुलांना चैनच पडत नाही. शालेय विद्यार्थी मोबाईल फोनचा वापर जास्त प्रमाणात करतांना आढळून येतात. अगदी बसता—उठता मोबाईल फोन त्यांच्या सोबत असतो. एवढेच नव्हे तर झोपतांना देखील मोबाईल त्यांच्या उशाशी असतो. हे विद्यार्थी मोबाईल फोनच्या पूर्णपणे आहारी गेलेले, अधीन झालेले दिसून येतात. मोबाईल चे फायदे जरी अनेक असतील तरी त्याच्या दुरूपयोगाकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. कधी कधी हाच मोबाईल शालेय विद्यार्थ्यांसाठी शाप ठरण्याची संभावना आहे.

२. शालेय शिक्षण घेत असलेल्या मुलांचे वय नैसर्गिक बदलाचे व संस्कारक्षम असते. चांगले—वाईट समजण्याची कुवत या विद्यार्थ्यांमध्ये नसते. वयाला न झेपणाऱ्या नको त्या गोष्टी नको त्या वयात विद्यार्थ्यांच्या हाती पडतात. मोबाईलद्वारे पाठविले जाणारे घाणेरडे मेसेज तसेच अश्लील चित्रे एका मोबाईल मधून दुसऱ्या मोबाईल मध्ये मेसेज पाठविले जातात व हया सर्व गोष्टी नको त्या वयात कौमार्य अवस्थेत असलेल्या विद्यार्थ्यांच्या हाती पडतात. ज्या गोष्टीचा अर्थ त्यांना धड समजत नसतो त्या गोष्टी मोबाईलद्वारे त्यांच्या हाती पडतात. त्याचा त्यांच्या कोमल मनावर काय परिणाम होत असेल? अशावेळेस मुले गोंधळुन जातात व नको त्या मार्गास लागतात व यातूनच त्यांना वाईट सवयी लागतात. याचाच परिणाम त्यांच्या विकासावर होतो व कुठेतरी त्यांची शैक्षणिक प्रगती खुंटते. विद्यार्थी अभ्यासापासून, कलागुण संपादनापासून दुरावतो. मित्राशी तासनतास गप्पा मारणे, एकमेकांना वेळी अवेळी मेसेज पाठविणे यात त्यांचा अमूल्य वेळ वाया जातोच परंतु कोमल मनावर चांगले संस्कार देखील होत नाही.

३. वाहन चालवतांना कानाला हेडफोन्स लावून गाणे ऐकणे हे तर एक फॅशनच होवून बसलेले आहे. म्हणूनच समोरून येणाऱ्या वाहनाकडे त्यांचे लक्ष नसते. बऱ्याचदा वाहन चालवतांना मुले फोनवर कुणाशी ना कुणाशी बोलतच असतात व अशातच अपघात होतात व कधी कधी त्यांना आपल्या प्राणालाही मुकावे लागते. अशा अनेक घटना आपल्या आजुबाजुला घडत असतांना आपण बघतो. परीक्षेच्या दिवसातही ही मुले मोबाईलशी खेळतांना दिसतात. त्यामुळे त्यांचे अभ्यासाकडे लक्ष लागत नाही व त्याचा विपरित परिणाम त्यांच्या परिक्षेवर तसेच निकालावर ही होतो. मोबाईल फोनचा विविध अंगानी विचार केला व व्यावसायिक दृष्टिकोन बाजूला ठेवला तर विद्यार्थ्यांच्या दृष्टीने तो घातकच सिध्द होतो.

४. मोबाईलने जरी मानव जीवन सुखकर केले असले तरी आजचा विद्यार्थी मोबाईलमुळे कुठे तरी दुर भरकटत चाललेला आहे. तेव्हा यावर विचार करून मंथन करण्याची गरज भासते.

५. दुसऱ्या शहरात, देशात लांब अंतरावर असणाऱ्या व्यक्तीशी केव्हाही कुठेही ताबडतोब संवाद साधता येतो. तो फक्त मोबाईलच्या अविष्कारामुळेच. विद्यार्थ्यांना जर एखादया क्षेत्राची, कंपनीची किंवा एखादया व्यक्तीची माहिती पाहिजे असेल तर मोबाईलद्वारे ताबडतोब मिळू शकते.

**समस्येचे विधान :**

‘ मोबाईलचा विद्यार्थ्यांच्या अध्ययनावर होणारा परिणाम : एक अभ्यास’

## कार्यात्मक व्याख्या

१. **मोबाईल** :— मोबाईललाच भ्रमणध्वनी असे म्हणतात. या व्दारे संदेशाची देवाण घेवाण शीघ्रातीशीघ्र होते. हे एक इलेक्ट्रानिक उपकरण असून ज्याद्वारे आपण हजारो किलोमीटर अंतरावर असणाऱ्या व्यक्तींशी ताबडतोब संवाद साधू शकतो.

२. **विद्यार्थी** :— श्शालेय शिक्षण घेणाऱ्या आठवी वी ते दहावी या वर्गातील मुलांचा गट.
**३. अध्ययन :—** विद्यार्थ्यांच्या वर्तनात होणारा टिकावू स्वरूपाचा बदल म्हणजे अध्ययन होय. शाळेत औपचारिकरित्या नाव दाखल करून विविध विषयाचे ज्ञान ग्रहण करणे म्हणजे अध्ययन होय.
४. **परिणाम** :— मोबाईलद्वारे विद्यार्थ्यांमध्ये होणारा चांगला किंवा वाईट बदल म्हणजे परिणाम.

## संशोधनाची उद्दिष्टे:

१. मोबाईलचा उपयोग करणाऱ्या विद्यार्थ्यांचा शोध घेणे.
२. विद्यार्थ्यांचा मोबाईल विषयी असलेला दृष्टिकोन अभ्यासणे.
३. शिक्षक व पालक हयांचा मोबाईलविषयी असलेला दृष्टिकोन अभ्यासणे.
४. मोबाईलचा विद्यार्थ्यांच्या अध्ययनावर होणाऱ्या परिणामांचा अभ्यास करणे.

## गृहीतके :—

१) मोबाईलद्वारे संदेशाची देवाण घेवाण ताबडतोब करता येते.
२) मोबाईल दैनंदिन जीवनाचा एक महत्वाचा घटक बनला आहे.

## संशोधनाची कार्यपध्दती :—

**१. संशोधन पध्दती :—** प्रस्तुत संशोधनासाठी सर्वेक्षण पध्दतीचा वापर करण्यात आला.
**२. संशोधनाची साधने :—** प्रस्तुत संशोधनासाठी प्रश्नावली, मुलाखत, प्रासंगिक नोंदी व चर्चा या तंत्रांचा वापर करण्यात आला.

## २. जनसंख्या व न्यादर्श :—

**जनसंख्या: —** प्रस्तुत संशोधनासाठी नागपूर शहरातील विद्यार्थी जनसंख्या दर्शवित आहे.
**न्यादर्श :—** नागपूर शहरातील २ माध्यमिक शाळेतील १०० विद्यार्थी, शिक्षक व पालक यांचा समावेश न्यादर्श म्हणून करण्यात आला.
**मर्यादा व व्याप्ती:—** प्रस्तुत संशोधन नागपूर शहरापुरतेच व शालेय शिक्षण घेणाऱ्या आठवी वी ते दहावी या वर्गातील विद्यार्थ्यांपुरतेच मर्यादित आहे.
**विश्लेषण पध्दती :—** प्रस्तुत संशोधनात संकलित केलेल्या माहितीचे वर्गीकरण करून प्राप्त प्रतिसादांचे शेकडा प्रमाण काढून मिळालेल्या माहितीचे विश्लेषण केलेले आहे.
**उद्दिष्ट क्र. १ :—** मोबाईल फोनचा वापर करणाऱ्या विद्यार्थ्यांचा शोध घेणे.
**उद्दिष्ट क्र २:—** विद्यार्थ्यांचा मोबाईल विषयी असलेला दृष्टिकोन अभ्यासणे.

उद्दिष्ट क्र. १ व २ चे पुढील प्रश्नांव्दारे व मुलाखतीव्दारे माहिती संकलित करून मिळालेल्या माहितीचे विश्लेषण केलेले आहे.

१ तुमच्या घरी मोबाईल फोन आहे का?
या प्रश्नाला प्रतिसाद देताना होय चे शेकडा प्रमाण १०० टक्के असून नाही चे प्रमाण शून्य टक्के आहे.
२. आपण दररोज मोबाईल हाताळता काय?
या प्रश्नाला प्रतिसाद देताना होय चे शेकडा प्रमाण ९० टक्के असून नाही चे प्रमाण १० टक्के आहे.
३. आपण दररोज मोबाईलव्दारे मित्रांना मेसेज पाठविता काय ?
या प्रश्नाला प्रतिसाद देताना होय चे शेकडा प्रमाण ६० टक्के असून नाही चे प्रमाण ४० टक्के आहे.
४. आईवडिल मोबाईलचा वापर करतात म्हणून आपणही करायला पाहिजे असे आपणाला वाटते काय?
या प्रश्नाला प्रतिसाद देताना होय चे शेकडा प्रमाण ६२ टक्के असून नाही चे प्रमाण ३८ टक्के आहे.
५. अभ्यास करताना मोबाईलचे रींगटोन आपल्याला विचलित करते काय?
या प्रश्नाला प्रतिसाद देताना होय चे शेकडा प्रमाण ६२ टक्के असून नाही चे प्रमाण ३८ टक्के आहे.
६. अभ्यास करताना अडचणी आल्यास मोबाईलचा उपयोग करता काय?

या प्रश्नाला प्रतिसाद देताना होय चे शेकडा प्रमाण ६० टक्के असून नाही चे प्रमाण ४० टक्के आहे.

**उद्दिष्ट क्र** ३:— शिक्षक व पालक हयांचा मोबाईलविषयी असलेला दृष्टिकोन अभ्यासणे.

१. आपल्या शाळेत विद्यार्थी मोबाईल आणतात काय?

या प्रश्नाला प्रतिसाद देताना होय चे शेकडा प्रमाण शून्य टक्के असून नाही चे प्रमाण १०० टक्के आहे.

२. आपल्या पाल्याने शाळेत मोबाईल न्यायला काही हरकत नाही असे आल्याला वाटते काय?

या प्रश्नाला प्रतिसाद देताना होय चे शेकडा प्रमाण ६० टक्के असून नाही चे प्रमाण ४० टक्के आहे.

३. मोबाईलमुळे मुलाचे अभ्यासाकडे लक्ष लागत नाही, असे आल्याला वाटते काय?

या प्रश्नाला शिक्षकांनी प्रतिसाद देताना होय चे शेकडा प्रमाण ६० टक्के असून नाही चे प्रमाण ४० टक्के आहे.

या प्रश्नाला पालकांनी प्रतिसाद देताना होय चे शेकडा प्रमाण ७० टक्के असून नाही चे प्रमाण ३० टक्के आहे.

४. आपले पाल्य मोबाईलवरून गेम डाउनलोड करून खेळतात काय?

या प्रश्नाला पालकांनी प्रतिसाद देताना होय चे शेकडा प्रमाण ६० टक्के असून नाही चे प्रमाण ४० टक्के आहे.

**उद्दिष्ट क्र** ४:— मोबाईलचा विद्यार्थ्यांच्या अध्ययनावर होणाऱ्या परिणामांचा अभ्यास करणे.

१. आपले मित्र वर्गातही रिकाम्या वेळात मोबाईचे विविध गेम यावर चर्चा करतात काय?

या प्रश्नाला प्रतिसाद देताना होय चे शेकडा प्रमाण ८० टक्के असून नाही चे प्रमाण २० टक्के आहे.

तसेच प्रस्तुत उदिष्टाच्या विश्लेषणसाठी विद्यार्थी पालक व शिक्षक यांच्याव्दारे प्रश्नावली, मुलाखत, प्रासंगिक नोंदी व चर्चा या तंत्रांचा वापर करून माहिती संकलित करण्यात आली.

मोबाईला पूर्णपणे टाळणे किंवा पुर्णपणे त्यापासून परावृत्त करणे कठीण काम आहे. मोबाईल एक अभ्यासाचे साधन बनलेले आहे. डीक्शनरीव्दारे कठीण शब्दांचा अर्थ शोधणे, त्याचे उच्चार तपासणे, वर्गात अनुपस्थित राहिल्यास मोबाईलव्दारे अभ्यास व होमवर्क याची माहिती जाणून घेता येते. पुस्तकातील कठीण संकल्पना समजून घेण्यासाठी त्या संकल्पनांची व्हिडीओ क्लीप पाहाता येते. दुसऱ्या शाळेतील शिक्षक तसेच नामवंत शिक्षक, शास्त्रज्ञ, लेखक, कवी यांच्याशी मोबाईलव्दारे संवाद साधता येतो. यावरून मोबाईलचा एक शैक्षणिक साधन म्हणून उपयोग करता येतो.

मोबाईलवर वारंवार मेसेज पाठविणे, गरज नसताना सहज म्हणून गप्पा मारण्यासाठी फोन लावणे, तासनतास गप्पा करणे, मोबाईलवरील खेळ, चॅटींग, वाट्सअॅप ट्विटर, फेसबुक इंटरनेट सर्फींग केल्याशिवाय मुलांना चैन न पडणे, पालकांनी मोबाईल खेळू दिला नाही तर आक्रमक होणे, लपून लपून मोबाईल तपासणे, वारंवार एकांतात जावून बोलणे, पालक अचानक आल्यास ताबडतोब मोबाईल बंद करणे, आव्हानात्मक गेम खेळणे, अभ्यास करताना मोबाईल जवळ ठेवून बसणे, लहान लहान बाबी वाट्सअॅप द्वारे शेअर करणे, रात्री बारा एक वाजेपर्यंत मोबाईलचा वापर करणे, अशा बाबी संशोधनातून निदर्शनास आल्या आहेत. अशा बाबी विद्यार्थ्यांच्या अध्ययनात बाधा निर्माण करतात.

**निष्कर्ष :—**

प्रस्तुत माहितीचे विश्लेषण करून पुढील निष्कर्ष काढण्यात आले.

१. सर्वच विद्यार्थी मोबाईल फोनचा वापर करतात.

२. बहूतेक ९० टक्के विद्यार्थी दररोज मोबाईल हाताळतात.

३. शाळेत विद्यार्थ्यांना मोबाईल आणण्यास मनाई केली जाते.

४. मोबाईल एक अभ्यासाचे साधन बनलेले आहे. डीक्शनरीव्दारे कठीण शब्दांचा अर्थ शोधणे त्याचे उच्चार तपासणे, वर्गात अनुपस्थित राहिल्यास मोबाईलव्दारे अभ्यास व होमवर्क याची माहिती जाणून घेता

येते. पुस्तकातील कठीण संकल्पना समजून घेण्यासाठी त्या संकल्पनांची व्हिडीओ क्लीप पाहाता येते. मोबाईलचा एक शैक्षणिक साधन म्हणून उपयोग करता येतो.

५. शेकडा ६० टक्के शिक्षकांच्या मते मोबाईलमुळे विद्यार्थ्याच्या अभ्यासात व्यत्यय येतो.

६. अभ्यास करताना मोबाईल जवळ ठेवून बसणे, लहान लहान बाबी वाट्सॲप द्वारे शेअर करणे. रात्री बारा एक वाजेपर्यंत मोबाईलचा वापर करणे, अशा बाबी संशोधनातून निदर्शनास आल्या आहेत. अशा बाबी विद्यार्थ्यांच्या अध्ययनात बाधा निर्माण करतात. यावरून विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीवर विपरित परिणाम होतो असे दिसून आल आहे. मोबाईलच्या अती वापरामुळे वेळेचा अपव्यय होवून विद्यार्थ्यांचे अभ्यासाकडे दुर्लक्ष होते व त्यांची प्रगती मंदावते.

## सारांश :—

मोबाईलचा एक शैक्षणिक साधन म्हणून अनेक विद्यार्थी उपयोग करतात. कठीण शब्दांचा अर्थ शोधणे, पूरक माहिती जाणून घेणे, शैक्षणिक प्रकल्प तयार करणे, पूरक वाचन करणे, व्याख्यान तयार करणे, विविध स्पर्धामध्ये भाग घेणे यासाठीही अनेक विद्यार्थी मोबाईलचा उपयोग करतात. काही विद्यार्थी मोबाईलच्या खूपच आहारी गेलेले आहेत. घरी पाहूणे आल्यास त्यांच्यासोबत बोलण्यापेक्षा मोबाईलवर खेळणे मुले अधिक पसंत करतात. मोबाईलच्या अती वापरामुळे आपला मुलगा अभ्यासच करीत नाही अशी पालकांची ओरड ऐकू येते. विशेष म्हणजे काही पालकही मोबाईलच्या खूपच आहारी गेलेले दिसून येतात. रात्री बारा एक वाजेपर्यंत मोबाईलचा वापर करणे, लपून लपून मोबाईल तपासणे, वारंवार एकांतात जावून बोलणे, पालक अचानक आल्यास ताबडतोब मोबाईल बंद करणे, आव्हानात्मक गेम खेळणे, अभ्यास करताना मोबाईल जवळ ठेवून बसणे अशा बाबी पालकाच्या निदर्शनास आल्यास त्याला सहजतेने घेवू नये. मुलाला चांगले काय? वाईट काय? याची वेळीच जाणिव करून देणे काळाची गरज आहे. मुलांसाठी वेळ देणे पालकाचे आद्य कर्तव्य आहे. पालकांनी मुलाला अभ्यासाला लावणे व त्याच्या बाजूला आपण मोबाईलशी खेळणे हे योग्य नाही. मोबाईलचा एक शैक्षणिक साधन म्हणून मर्यादित उपयोग करावा. दुरूपयोग होणार नाही याकडे पालकांनी विशेष लक्ष द्यावे.

## संदर्भ:

१. पाटील वा.भा., (१९९९), संशोधन पध्दती, नागपूर : श्रीमंगेश प्रकाशन.

२. पारसनिस हेमलता (२००६), शैक्षणिक संशोधन माहिती संकलन तंत्रे व साधने, पुणे: नित्यनुतन प्रकाशन.

३. बापट भा.गो.(१९८५), ‘शैक्षणिक संशोधन’, पूणे, नूतन प्रकाशन

४. भितांडे वि.रा.(१९९४), ‘शैक्षणिक संशोधन पध्दती’, नूतन प्रकाशन.